# साय-फाय करंडक २०१८ चषकाचे अनावरण

प्रभात वृत्तसेवा

पुणे,दि. ८ - क्वीक हिल फाउंडेशनने सायबर सुरक्षेसंदर्भात जनजागृती निर्माण करण्यासाठी आयोजित केलेल्या साय-फाय करंडक २०१८ या स्पर्धेसाठीच्या चषकाचे अनावरण केले. महाराष्ट्र सायबर आणि सुप्रसिद्ध थिएटर ग्रुप थिएटर अकादमीच्या साथीने १६ डिसेंबर २०१८ रोजी होत असलेल्या महाअंतिम फेरीसंदर्भात पुणे पोलीस आयुक्तालयात यासंदर्भात पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

ऑगस्ट २०१८ मध्ये जाहीर झालेल्या साय-फाय करंडकाच्या दुसऱ्या आवृत्तीला राज्यभरातून प्रतिसाद मिळाला होता. १०० हून अधिक संघांनी सहभागी होण्यासाठी प्रवेशिका पाठविल्या होत्या. थिएटर अकादमीने अध्यक्ष आणि प्रसिद्ध नाट्य कलाकार प्रसाद पुरंदरे यांच्या नेतृत्वाखाली पुणे, मुंबई, औरंगाबाद, कोल्हापूर, गोवा आणि नागपूर येथे विभागीय ऑडिशन्स घेण्यात आल्या.

चषकाचे अनावरण करताना क्वीक हील टेक्नॉलॉजीचे मॅनेजिंग डायरेक्टर आणि सीईओ कैलाश काटकर म्हणाले की, सायबर धोक्यांपासून बचावात कुठलेही अपयश आले तर, तुमची संवेदनशील माहिती सायबर गुन्हेगारांपर्यंत पोहोचते आणि वाईट उद्देशाने ते अनैतिक गोष्टी करतात. त्यामुळे जागरुकता ही काळाची गरज आहे.

महाराष्ट्र सायबरचे आयजीपी ब्रिजेश सिंग म्हणाले की, डिजिटल तंत्रज्ञान ज्या वेगाने आपल्या आयुष्यात प्रवेश करत आहे. ते पाहता सर्वसामान्यांनी डिजिटल देवाण-घेवाणीसाठी सायबर सुरक्षा असण्याला सर्वोच्च प्राधान्य देणे गरजेचे आहे. दुर्दैवाने, आपण असे अनेक लोक पाहतो जे सायबर सुरक्षेला गरज न मानता चैन समजतात.

थिएटर अकादमीचे अध्यक्ष प्रसाद पुरंदरे म्हणाले की, समाजात बदल घडविण्यासाठी कला ही अतिशय मोठी भूमिका बजावते आणि लोकांना नवीन कल्पना व घडामोडी सांगण्यासाठी याचा अनेक वेळा वापर करण्यात आला आहे.